# 'तानाजी मालुसरा' - पोवाडा

(शाहीर तुलशीदास)

खुद्द शिवचरित्रासंबधी दोनच पोवाडे उपलब्ध आहेत. पहिला अज्ञानदास शाहीराचा 'अफजलखान - वध' व दुसरा शाहीर तुलशीदासाचा 'तानाजी मालुसरा'.

हे दोन्ही पोवाडे शिवकालीन समजले जात परंतु या पोवाड्यांची रचना शिवकालीन आहे की नाही या विषयी शंका आहे. ग. ह. खरे यांनी अज्ञानदासाचा 'अफझलखान - वध' हा पोवाडा स. १७०० नंतरचा तर द. वा. पोतदारांनी तुळशीदासाचा 'तानाजीचा पोवाडा' पेशवेकालीन ठरवला आहे.

या पोवाड्यामागे एक रंजक घटना आहे. सुमारे सव्वाशे-वर्षांपूर्वी शालीग्राम व आक्वर्थ यांनी इतर पुष्कळ पोवाडे जमविले पण हाच तेव्हढा पोवाडा त्यांना मिळत नव्हता आणि दुर्दैवाने त्यांना तो न मिळता तर ज्या एकट्या अतिवृद्ध गोंधळ्याला तो येत होता त्याच्याच बरोबर तो नाहिसा झाला असता

या विस्तृत पोवाड्याचे ५५ चौक आहेत. या अद्‌भुतरम्य प्रसंगाची माहिती सर्वांना अवगत आहे त्याचे सर्व श्रेय या उत्कृष्ट पोवाड्यालाच द्यावे लागेल.
या विस्तृत पोवाड्याचा हा संक्षिप्त भाग.

# तानाजी मालुसरा पोवाडा
## शाहीर तुळशीदास

(संक्षिप्त रूप : शाहीर प्रभाकर जामखेडकर, मुंबई )

राजगड राजाचा । प्रतापगड जिजाबाईचा ॥
सिंहगड पन्हाळा । पहा त्या मोंगलाचा ॥
शिवाजी महाराज । राजगड किल्ल्यावर बसले ॥
जिजाबाई माता । आहे प्रतापगडावरी ॥
सोमवारच्या दिवशी । हाती हस्तनाची फणी ॥
उगवते बाजू नजर गेली । नजर सिंहगडावर गेली ॥

बारा मावळ पुण्यारवाली । बारा मावळ जुनरारवाली ॥
पुण्याच्या तोंडाला (जेजुरीच्या बारीहा किल्ला सिंहगड पाहिला ॥
नवे कोंबडिचे अंडे । (ऐसा) किल्ला सिंहगड झळकला ॥
ऐसा पंतोजी तो काका । त्याने हुजऱ्या बोलाविला ॥
"जावे राजगड किल्ल्याला । अंचवावे प्रतापगडाला" ॥

शिवाजी महाराज पांच पोषाख जल्ला । पाई तुमानी सुरवारी चढविल्या ॥
आले प्रतापगड किल्ल्याला । सलाम जिजाबाईला केला ॥
"धाडला तुम्ही हुजराचा जासूद । काम सांगावे आम्हाला ॥
"शिवाजी महाराज । डाव फाशाचा खेळावा ॥
तिन डाव गेले ज्याचे । त्या शिवाजी महाराजाचे ॥
"जिजाबाई ग माते । आता डाव येऊदे मुझा" ॥
बाईचे तिरपगडे पडले । जिजाबाईचे डाव पुरे रे झाले ॥
"ऐक जिजाबाई । सत्तावीस किल्ल्यांचा मी राजा ॥
माग माग जिजाबाई । जे मागाल ते देतो तुज ॥
"सिंहगड किल्ला घेणे । मला कोणी उमराव दिसेना" ॥
किल्ला घेईल सुभेदार । तानाजी सुभेदार ॥
खरखर खरवोटा लिहिला । ज्याने हुजऱ्या बोलाविला ॥

जासुद महाराजांचा पाहिला | तानाजी सुभेदार सुखी झाला ||
पोटी रायबा जो बेटा | सयंवर बाळाचे मांडिले ||
काढल्या पंचमीच्या हळदी | काढले षष्ठीचे लगीन ||
लगीन बाळाचे मांडिले | आली सिंहगडची कामागिरी ||
लगीन रायबाचे राहिले | ज्याने उमराव बोलाविले ||
मामा बोलाया लागला | ऐंशी वर्षांचा म्हातारा ||
"सिंहगड किल्ल्याची वार्ता | काढू नको तानाजी सुभेदारा ||
जे गेले सिंहगडाला | ते मरुन शानी गेले ||
धुव्वा सपाटा होईल | असे बोलू नको रे मामा ||
आम्ही सूरमर्द क्षत्री | नाही भिणार मरणाला ||

बारा हजार फौज घेऊन | सुभेदार दरवाजाला आला ||
जिजाबाई बोलली | तानाजी सुभेदाराला ||
"माझा सुभेदार ब्राह्मणा" | हात मस्तकी ठेविले ||
"माग माग जिजाबाई | जे मागशिल देतो तुला" ||
"काय मागू सुभेदाराला ! | ह्या म्हातारपणी सिंहगड किल्ला ||
घेऊन द्यावा मला | आयुष्य मागेन तुझ्या रजाला ||
माझा शिवाजी थोरला |
माझा तानाजी धाकटा | लेकाचे वाण दिले त्याला ||

चला माझे दादांनो | हुकूम सैन्याला केला ||
बारा हजार फौज गेली | कल्याण दरवाज्याला ||
ज्याने पेटारा उघाडिला | काढीली यशवंत घोरपड ||
सात शेर शेंदुर | तिच्या मस्तकी थापिला ||
भांग मोत्याचा भरला | चरणी मस्तक ठेविले ||
सारवळी कमरेला बांधली | यशवंत घोरपड ज्याने किल्ल्याला लावली ||
अर्ध्या किल्ल्याला गेली | घोरपड माघारी परतली ||
आउक्ष तानाजीचे समजली | घोरपड फिरली ती सुभेदाराने पाहिली ||
"सत्तावीस किल्ले मी घेतले | घोरपड कधी मागे नाही फिरली" ||
राग आला त्या मर्दाला मी आहे मराठ्याचा पोर नाही भिणार मरणाला ||
एक हात टाकीन अठरा खांडोळी पाडीन, शिळ्या भाकरी संगे खाईन" ||
त्या मरणाच्या धास्तीने | सात वेढे जी फिरली नरवे रोऊन बसली ||

सुभेदार बोलतो सेनेला । "पहिली सोल शिवाजी महाराजांची ॥
दुसरी सोल अंबाबाईची । तिसरी सोल तानाजी सुभेदाराची" ॥
पट्टे घेतले तोंडामधी । सोल धरली हातामधी ॥
आपल्या बेताचे माणुस, पन्नास मोजले सुभेदार गडावर चढले ॥
सूर्याजी तो बंधु । त्याने एकच गर्दी केली ॥
तीन पुरुष वरती गेले । सोल मधीच तुटली ॥
"काय सांगू सुभेदारा । सोल ते तुटली आली मरणाची वेळा" ॥
"सुभेदार बोलाया लागला । नाही सोल रे तुटली माझे आयुष्य तुटले ॥
एक एक शेलार मामा । माझ्या रायबा बेट्याला रामराम सांगा" ॥
गेले पहिले दरवाजाला । ज्याने दिंडीने पाहिला ॥
पहिला दरवाजा मारिला । गेला दुसऱ्या दरवाजाला ॥
तानाजी सुभेदार, जसा रणात वाघ लोटला सेनात
पाच पट्ट्यांचा मारा केला । सवा घटकेमधी तिनशे पठाण कापिला ॥
गेला तिसऱ्या दरवाजाला । होता चारशे पठाण ॥
दिन दिन ज्याने वाहिला । चारशे पठाण कापिला ॥
एकंदर हिशेब नऊशे मनुष्यांचा झाला
त्यात बोंब्या निघून गेला । उदेभान मोगला पाशी गेला ॥
"मेरे उदेभान भाई, आग लगो ह्या घोन्याला । सिंहगड किल्ला डुब हो गया ॥
नऊशे पठाण काट्या । बादशाईचा हत्ती काट्या ॥
सिद्दी हिलाल काट्या । तुम्हारे बारा लडके काट्या!" ॥
लेकांचा तो दुःखाचा शब्द । ज्याच्या उरामधी बसला ॥
गेला पिराच्या दरग्याला । सवामण ऊद जाळिला ॥
दादा नऊशे पठाण । ज्याने दिमतीला घेतला ॥
"सलाम मेरे भाई । उंबराव किस्का सांगावा मजला" ॥
"उंबराव शिवाजी महाराजांचा । आहे मी तानाजी सुभेदार ॥
उंबराव शिवाजी महाराजांचा । आहे मी तानाजी सुभेदार ॥
उंबराव मोगलाने पाहिला । "ऐसा भला आहेस रे दादा" ॥
"तुझ्यासारखा भाई पाहिजे असावा । खाणे घालावे वजिराला, वजीर पाहावा बाजूला
सोड महाराजांची चाकरी । कर माझी मोगलाची चाकरी ॥
हवाला देतो सिंहगडाचा । हजार रुपयांची तैनात देतो बसून खायाला ॥
सुभेदार बोले मोगलाला । "सोड सिंहगडाची गादी" ॥

चल माझ्या राजगड किल्ल्याला । चलावे महाराजाचे भेटीला ||
राजगड किल्ल्याचा हवाला । उदेभाना देतो तुला" ||
एवढ्या भावावरून । घुस्सा आला मोगलाला ||
"पहिला हात येऊ दे तुझा" । "उदेभान हात येऊ दे तुझा" ||
तानाजी सुभेदार धावा अंबेचा मांडिला । धाव धाव अंबाबाई ||
नऊ हात जमीन उडाला । मोगलाला माराया गेला ||
हातामधे हात ज्याने अठरा टाकिले । गुंजभर नाही तो सरला ||
"ऐका उदेभान [redacted] मोगला । पाहिला हात माझा झाला ||
दुसरा हात येऊ दे तुझा" । सुभेदार बोलतो "मामा ऐका निर्वाणीची वेळा ||
लग्न करा रायबाचे । दोहो हातांचा मुजरा सांगा शिवाजी महाराजाला" ||
उदेभान मोगल बारा हात जमीन उडाला । ||
कचक सुरबाईचा दाविला मारा फैसाचा केला । ||
पन्नास वेढे पागोट्याचे, पन्नास वेढे मंदिलाचे, बेंबी पावेतो चिरीत नेला । ||
सुभेदार धरणीला लोटिला ||
मग तो शेलार मामाने । मुर्दा मांडीवर घेतला ||
सुभेदार मेलेला मुरदा इरशाने झाला ||
ऐंशी वर्षांचा तो मामा त्याच्या आंगात संचारला ||
मग तो सुभेदाराचा पट्टा । शेलार मामाने घेतला ||
"फिर गे मर्दाचे लंडे फिर ग मर्दाचे लंडे । ||
मोगल मागे पहात होता ||
दोहो हातांनी कचका दिला । बेंबी पावता चिरीत नेला ||
खुदा खुदा बोलिला । बुधा धरणीला पाडिला ||
देवीने आपल्या हातून दरवाजा उघडिला । ||
पन्नास कमी बारा हजार फौज किल्ल्याला घेतली || ||
ज्याचा सूर्याबा तो बंधु । मामाला पुसाया लागला || ||
"शेलार रे मामा । माझा दादा रे कुठे आहे बंधु रे कुठे आहे" || ||
शेलार मामा बोलला । जरी मेलासे बोलले, तर सारी फौज बसेल || ||
"सुभेदार आहे बाले सद्रेमधी । "मी आहे कल्याण दरवाजाला || ||
नऊशे पठाण मारावा । मग जाऊ दादाच्या भेटीला" || ||
मग त्या बारा हजार फौजेने । ज्याने हर हर वाहिला || ||
एका एकाच्या मागे तिघे तिघे लागले । नऊशे पठाण कापिला || ||

पांढरे निशाण उपटले । भगवा झेंडा शिवाजीचा ॥
पांच तोफा जो मारिल्या । यशाच्या तोफा जो मारिल्या ॥
शिवाजी महाराज बोलला । माझ्या सुभेदाराने सिंहगड सही केला ॥
शिवाजी महाराजाने । यशाच्या दहा तोफा सोडिल्या ॥
अबीर गुलाल । ज्याचे मुर्द्यात भरला ॥
दोरा रेशमाचा घातला । मुर्दा पालखीत ठेविला ॥
वाजत गाजत मुर्दा । गेला राजगड किल्ल्याला ॥
शिवाजी महाराजाने । मुर्दा पाहिला सुभेदाराचा ॥
जिजाई धावत आली । पालखी पाहिली ॥
रायबा बोलतो । बाबा आले माझे लग्नाला ॥
पालखी पाहुनी धावत आला । मुर्दा बाबाचा पाहिला ॥
शिवाजी राजान । मुलगा पोटासंग धरिला ॥
" भिऊ नको माझे बेटा । शिवाजी महाराज तो गेला,
तानाजी सुभेदार आहे तुला ॥
बारा दिवसांचे सुतक धरिले । शिवाजी महाराजांनी सुभेदाराचे ॥
मग तेराव्या दिवसात । स्वयंवर बाळाचे मांडिले ॥
पाहिली नवरी रद्द केली । कडाशीचे दरकराची केली रायबा बेट्याला ॥
बापाची सरदारी । दिली रायबा बेट्याला ॥
तुळशीदास शाहीर । त्याने सदरेला आणिला ॥
डफ तुणतुणे घेऊन । मग त्या तान्हाजी सुभेदाराला ॥
शिवाजी महाराजांचा । पोवाडा कटिबंध केला ॥
हजार रुपयांचा तोडा । हातामधी घातला त्यारे तुळशीदास शाहीराच्या ॥
शूर मर्दाचा पोवाडा । शूर मर्दाने ऐकावा ॥
शिवाजीचे राज्यात । ऐसा उमराव होणे नाही ॥
पोवाडा गाल्याला उद्धार ऐकल्याला घडो पुण्य । ॥
सत्ययुगीचा पोवाडा कालियुगी वर्तला । ॥
सत्तावीस किल्ल्यांचा सरदार निघून शानी गेला ॥
ऐसा पुनः होणे नाही ॥

— ० —